**प्रेस नोट दिनांक १६/०७/२०१९**

**खडक पोलीस ठाणे, पुणे शहर**

**कासेवाडी भवानी पेठेत घरफोडी करणाऱ्या गुन्हेगाराला अटक**

सदर बाबत अधिक माहिती अशी की, खडक पोलीस स्टेशन तपास पथकातील अधिकारी/कर्मचारी हे खडक पोलीस स्टेशनला हजर असतांना पोलीस पोकॉ महावीर दावणे व पोकॉ आशिष चव्हाण यांना त्यांचे बातमीदाराने बातमी दिली की, काही काशेवाडी येथे बंद घर फोडुन देवीच्या मुखवटा, सोन्याचे मंगळसुत्र, देवाचे टाक असे चोरी करणार इसम हा मंत्रा बार समोर सार्वजनिक रोडवर थांबला असल्याची बातमी मिळाल्याने त्यास स्टाफचे मदतीने घेराव घालुन ताब्यात घेवुन त्यास त्याचे नाव पत्ता विचारता त्याने आपले नाव जुबेरअहमद निसाबउल्ला खान वय २८ वर्षे सध्या खान यांचे फ्रीज गोडाऊन जायका हॉटेल शेजारी, चिखली कुदळवाडी पुणे असे सांगितले. त्याचेकडुन दाखल गुन्हयात चोरीस गेलेले सोन्याचे दोन पदरी, देवीचा चांदीचा मुखवटा, पाच चौकोनी आकाराचे चांदीचे टाक, लहान मुलांच्या पायातील चांदीच्या पट्ट्या, लहान बाळाचे चांदीचे वाळे असा एकुण ४०,६००/- रुपये किंमतीचा घरफोडी करुन चोरुन नेलेला माल हस्तगत करण्यात आलेला आहे.

**( भरत जाधव )**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
खडक पोलीस ठाणे, पुणे शहर.